पुण्य नगरी

# ‘रवळनाथ ’मध्ये २ कोटी ८१ लाख ठेव संकलन

**गडहिंग्लज :** येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या १६ शाखांत मिळून दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर २ कोटी ८१ लाख रुपये ठेव जमा झाल्याची माहिती ‘रवळनाथ’चे



संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. चौगुले म्हणाले, ‘रवळनाथ’मध्ये ठेवींच्या स्वरूपात केलेली गुंतवणूकही अधिक सुरक्षित अशी आमच्या असंख्य ग्राहक वर्गानेच जनमाणसात विश्वासार्हता निर्माण केली आहे. त्यामुळेच दिवाळी पाडव्यानिमित्त सभासद, ठेवीदारांनी आणि नवीन ग्राहकांनी देखील ‘रवळनाथ’मध्ये ठेवी जमा करून संस्थेची विश्वासार्हता वृद्धिंगत केली आहे. याकामी ‘रवळनाथ’चे संचालक, सभासद, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगदान दिले आहे. आजअखेर संस्थेकडे ५३० कोटींहून अधिक ठेवी असून, ३७४ कोटींचे कर्ज वितरण केले आहे. यावेळी उपाध्यक्षा मीना रिंगणे, डी. के. मायदेव यांच्यासह संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

Kolhapur Edition

Oct 25, 2025 Page No. 04

Powered by: erelego.com